देयकांचे अदायगीकामी लेखा
विभागाकडे बिले सादर करतांना
करावयाच्या कार्यवाहीबाबत...

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८**
**लेखा विभाग** १३८०८
**जावक क्र.लेखा/१अ/कावि/१२८४/२०१८**
**दिनांक – २९ नोव्हेंबर २०१८**

**परिपत्रक,**

आर्थिक वर्ष संपण्यास थोडाच कालावधी शिल्लक आहे. सदर कालावधीमध्ये वेगवेगळ्या विभागांकडून लेखा विभागात देयके, नस्त्या अभिप्रायासाठी सादर केल्या जातात. सदरची देयके किंवा नस्त्या ह्या मार्च महिन्याच्या अखेरीस सादर करण्याचा कल दिसून येतो. त्यामुळे लेखा विभागावर कामाचा ताण वाढून शेवटच्या टप्प्यात कामकाज वाढते व कंत्राटदारांची देयके वेळेत अदा करण्यास अडचण निर्माण होते. सदर बाबींमध्ये सुसुत्रता आणणे आवश्यक आहे. सबब, विभागांनी लेखा शाखेत वेळेवर देयके सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१. ३० नोव्हेंबर पूर्वी जी कामे पूर्ण झाली आहेत व ज्या कामांचा पूर्णत्वाचा दाखला (Completion Certificate) प्राप्त आहे अशी बांधकाम विषयक सर्व देयके ३१ डिसेंबर पर्यंतच लेखा विभागात सादर करावीत.
२. ज्या वस्तूंचा पुरवठा ३० नोव्हेंबर पूर्वी झालेला आहे अशी देयकेही ३१ डिसेंबर पर्यंत सादर करावीत.
३. ज्या बाबींच्या सेवा मासिक तत्वावर घेतल्या आहेत अशी ३० नोव्हेंबर पर्यंतची देयके ही ३१ डिसेंबर पर्यंत सादर करावीत.

वरील परिपत्रकाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रति,
सर्व विभागप्रमुख

Scanned by CamScanner